**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**

**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रायगड जिल्हा)**

**(०२३५८) २८२३८७**

**अंक ५५/२०१९** **दिनांक ०९/०७/२०१९** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. अशोककुमार चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविदया विभाग
९४२२३७३३९६

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविदया विभाग
९४२२३७४००१


| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक ०३/०७/२०१९ ते ०९/०७/२०१९) | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक १०/०७/२०१९ सकाळी ८:३० पासून १४/०७/२०१९ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३/०७ | ०४/०७ | ०५/०७ | ०६/०७ | ०७/०७ | ०८/०७ | ०९/०७ | | १०/०७ | ११/०७ | १२/०७ | १३/०७ | १४/०७ |
| ४.८ | १३.२ | ३५.४ | ११७.८ | १२२.२ | ३९.२ | ७५.८ | **पाऊस (मिमी)** | ६५ | ६७ | ३५ | ५४ | ५४ |
| - | - | - | - | - | - | - | **कमाल तापमान (अं.से)** | ३० | ३० | २९ | २९ | ३० |
| - | - | - | - | - | - | - | **किमान तापमान (अं.से)** | २७ | २७ | २६ | २६ | २६ |
| - | - | - | - | - | - | - | **मेघाच्छादन (ऑक्टा)** | ८ | ८ | ८ | ७ | ८ |
| - | - | - | - | - | - | - | **सकाळची सापेक्ष आर्द्रता** | ९१ | ९० | ९१ | ९० | ९१ |
| - | - | - | - | - | - | - | **दुपारची सापेक्ष आर्द्रता** | ७९ | ८० | ८१ | ७९ | ७६ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याचा वेग (किमी/तास)** | १६ | १४ | १५ | १४ | १३ |
| - | - | - | - | - | - | - | **वाऱ्याची दिशा** | २३३ | २२३ | २१० | २०८ | २२० |

| | पाऊस (मिमी) १/१/२०१९ पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| ४०८.४ | ११६२.४ | ३५५८.३ |

**हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला**

**दिनांक १० ते १४ जुलै, २०१९ पर्यंत पावसाची शक्यता असून वाऱ्याच्या वेगात १३ ते १६ कि.मी./तास वाढ संभवते.**

**दिनांक १२ ते १८ जुलै, २०१९ साठी कोंकण विभागासाठी पर्जन्यमानाचा विस्तारित श्रेणी अंदाज हा सामान्यपेक्षा जास्त राहील.**

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **भात** | **रोप अवस्था** | • भात क्षेत्रातील बांधाची बांधबंधीस्ती करावी तसेच बांध तणमुक्त ठेवावेत.<br>• मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता भात खाचरातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी तसेच लावणीनंतर पहिल्या ३० दिवसांपर्यंत भात खाचरात पाण्याची पातळी २.५ ते ५ सें.मी. पर्यंत ठेवावी जेणेकरून तण प्रादुर्भाव कमी होईल.<br>• भात पिकाची पुर्नलागवड करण्यापूर्वी चिखलणी करावी. चिखलणीच्या वेळेस हेक्टरी ८७ कि.ग्रॅ. युरिया, ३१३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फोस्फेट आणि ८४ कि.ग्रॅ. म्युरेट ऑफ पोटश खते मिसळावे. गिरीपुष्पाचा पाला चिखलणीच्या वेळीस गाडल्यास ५० टक्के नत्र खताची (युरिया) मात्रा कमी दयावी.<br>__टिप:__ चिखलणीच्या वेळी खते देताना पाऊसाची तीव्रता पाहून खते दयावी.<br>• पुर्नलागवडीसाठी भाताची १२ ते १५ सें.मी. उंचीची पाच ते सहा पाने फुटलेली २० ते २७ दिवसांची रोपे योग्य असतात. यामध्ये हळव्या जातींसाठी २० दिवसांची आणि निमगरव्या आणि गरव्या जातींसाठी २७ ते ३० दिवसांची रोपे योग्य असतात.<br>• भात पिकाची पुर्नलागवड १५ X १५ सें.मी.(हळव्या जातींसाठी) किंवा २० X १५ सें.मी.(निमगरव्या व गरव्या जातींसाठी) व अंतरावर करावी. लावणी सरळ आणि उथळ २.५ ते ३.५ सें.मी. खोल करावी. उथळ लावणी केल्याने फुटवे चांगले येतात. एका चुडामध्ये दोन ते तीन रोपे लावावीत आणि संकरीत भातासाठी एका ठिकाणी एकच रोप लावावे. |
| **नागली** | **रोप अवस्था** | • मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता रोपवाटीकेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• नागली रोपवाटीकेतील तणांची बेणणी करावी.<br>• लागवड करावयाच्या क्षेत्रामध्ये हलकी नांगरणी करून लावणीपूर्वी प्रति हेक्टरी ५ टन शेणखत किंवा कंपोस्ट जमिनीत एकसारखे |
| **नवीन फळबाग लागवड** | **वाढीची अवस्था** | • पुढील पाचही दिवस वाऱ्याच्या वेगामध्ये वाढ संभवत असल्याने नवीन लागवड केलेल्या फळबागेतील रोपांना काठीचा आधार दयावा. |
| **नारळ/ सुपारी** | - | • मुसळधार पाऊसाची शक्यता लक्षात घेता नारळ व सुपारी बागेतील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला** | **लागवड** | • भाजीपाला लागवड केलेल्या क्षेत्रातील अतिरिक्त पाण्याचा निचरा होण्याची व्यवस्था करावी.<br>• वेलवर्गीय भाजीपाला पिकांना काठीचा आधार दयावा किंवा मंडपाची व्यवस्था करावी. |
| **दुभती जनावरे/ शेळ्या/ कुकुटपालन** | - | • जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच शेड मध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांचे येणाऱ्या पाऊसापासून योग्य ते संरक्षण करावे.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी पॅरा गवत, संकरीत नेपियर (जयवंत को- ३, यशवंत) या बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली.**

**अधिक माहितीसाठी नजीकच्या कृषी विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषी अधिकारी यांच्याशी संपर्क करावा**